# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

**MARATHI**

*India's National Spiritual Newspaper*

₹ 10/-

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE
REACHING NATIONS

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXV | JUNE 2023 | No. 05


## पवित्र शास्त्र

**कृपया हा शास्त्र भाग पाठ करा**

स्तोत्र : ४७ : १-९

१) असे सर्व लोकहो, टाळ्या वाजवा; उत्साह शब्दांनी देवाचा जयजयकार करा.

२) कारण परमेश्वर परात्पर व भयप्रद आहे; तो अखिल पृथ्वीचा महान सार्वभौम राजा आहे.

३) तो लोकांस हतवीर्य करुन आमच्या ताब्यात देतो; राष्ट्रांस आमच्या पायांखाली घालितो.

४) त्याचा आवडता याकोब यास ज्या वतनाचा अभिमान होता; ते त्याने आम्हांसाठी निवडिले आहे.

५) जयघोष होत असतां देव वर गेला आहे, करण्याचा शब्द होत असता परमेश्वर वर गेला आहे.

६) देवाची स्तुतिस्तोत्रें गा, स्तुतीस्तोत्रे गा; आमच्या राजाची स्तुतिस्तोत्रे गा, स्तुतिस्तोत्रे गा.

७) कारण देव सर्व पृथ्वीचा राजा आहे; तुम्ही लक्षपूर्वक त्याची स्तुतीस्तोत्रे गा.

८) देव राष्ट्रांवर राज्य करीत आहे; देव आपल्या पवित्र सिंहासनावर बसला आहे.

९) राष्ट्रांतले अधिपति जमले आहेत; अब्राहामाच्या देवाची प्रजा एकत्र झाली आहे; कारण पृथ्वीवरील सर्व ढाली देवाच्या आहेत, तो परमथोर आहे.

# नविन काळाचा स्विकार करा किंवा तुम्ही त्याला मनाचा गोंधळ म्हणू शकता!

**EMBRACE THE NEW SEASON OR YOU CAN NAME IT AS DISTRACTIONS!**

(सिस्टर अन्जेलीना सेल्वाकुमारी)



यहोशवा हे पुस्तक नव्या कालखंडाच्या सुरुवातीची खुण आहे, इस्त्रायली प्रजेच्या जीवनातील नवीन काळ इस्त्रायलच्या इतिहासातील मोशेया श्रेष्ठ पुढाऱ्याच्या मृत्युनंतर, यहोशवाची त्याच्या जागी निवड केली गेली. आणि ती त्याच्याकरिता फार मोठी जबाबदारी होती. यहोशवाला ते पाचारण स्विकारणे ही सोपी गोष्ट नव्हती. तो जरी मोशेच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षित झाला होता, तरी देखील त्याच्या डोक्यात काय विचार आले असतील याची कल्पना देखील करता येत नाही. इस्त्रायल लोकांनी मोशेला कशाप्रकारची वागणूक दिली आणि मोशेला शेवटी काय झाले हे सर्व त्याने स्वत: पाहिले होते. यामुळे तो पूर्णपणे घाबरुन गेला असेल. परंतु मोशेने त्याजवर आपले हात ठेवून त्याला जबाबदारी पुढे नेण्यासाठी नेमिले. (अनुवाद ३४:९) या वचनात म्हटले आहे; ''**नूनाचा पुत्र यहोशवा याच्या ठायी बुद्धीची पूर्ण प्रेरणा झाली होती; कारण मोशेने त्याजवर अपले हात ठेविले होते; परमेश्वराने मोशाला सांगितल्याप्रमाणे इस्त्राएल लोक त्याच्या आज्ञेत राहून वर्तू लागले.**

मला वाटते तरी देखील यहोशवाला आत्मविश्वास नव्हता आणि मला वाटते म्हणूनच देवाला पहिल्या अध्यायात वारंवार ''खंबीर हो, हिंत धीर, भिंऊ नको, घाबरु नको.'' जसा मोशा

(...पान ३ वर)




एको ऑफ हिज कॉल पाच मिनिटांचा संदेश

यू ट्युब ख्रिश्चन चॅनल

पास्टर सॅम सेल्वा राज

यांच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

प्रतिदिनी - पहाटे पाच वाजता   रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)

REACHING NATIONS



# तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



"...पण आम्ही आपल्या देवाची प्रार्थना केली आणि त्यांच्या भीतीने त्यांच्यावर अहोरात्र पाळत ठेविली...." (नहेम्या ४:९)

## आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

ख्रिस्तामधील अतिप्रिय मित्रानों!

तुम्हांस शांति असो! तुम्ही सर्व सुस्थितीत रहा आणि बहुगुणित व्हा. आमचा तुम्हाला प्रार्थनेचा आधार आहे. कृपया हा अंक शेवट पर्यंत वाचा.

देवाने आम्हाला आशीर्वाद दिला. देवाने आम्हाला आवश्यक असलेले प्रकृति स्वास्थ्य, बळ, संरक्षण आणि समाधान पुरविले आणि तो आमच्या वर लक्ष ठेवून होता. प्रभु येशु ख्रिस्त चांगला आहे. तो तुमच्या बरोबर नेहमीच राहो.

## तुम्ही लक्षात ठेवावी अशी माहिती :-

१) दररोज रात्री १० वाजता आपली प्रार्थनेची वेळ आहे! तुम्ही कोणत्याही शहरात किंवा देशात असाल, आमची तुम्हाला विनंती आहे; रात्री १० वाजता जगभरातील लेकरे, तरुण-तरुणी जीआपली भावी पिढी आहे. त्यांच्याकरीता प्रार्थना करा. या सेवाकार्याला आम्ही **"Global Vision for Youth and Kid Care"** असे म्हणतो. या सेवेद्वारे देव असंख्य अशा मुला-मुलींना आशीर्वादत करीत आहे. तुम्ही यासंबंधातील माहिती आमच्या "**एको ऑफ हीज कॉल**"च्या **यूट्युब चॅनलवर** पाहू शकता आणि भविष्यात देवाची स्तुती करु शकता. **कृपया या यूट्युब चॅनलचे वर्गणीदार बना;** म्हणजे त्याद्वारे तुम्ही साक्षी, प्रार्थना, विनंत्या आणि संदेश ऐकू शकता. आमचे +९१-९८४१०७१८५८ आणि +९१-४१२७१८५८ हे दोन वॉटस् अॅप क्रमांक तुमच्या मोबाईल मध्ये जपून ठषवा. आम्ही हे दोन मोबाईल क्रमांक वापरीत आहोत. धन्यवाद!

२) **एको ऑफ हीज कॉल यूट्युब चॅनलवर** दररोज पहाटे ५ वाजता, पाच मिनिटांचा मननपर संदेश आणि प्रार्थना देखील ऐकता येते. हे संदेश पास्टर एस्. सॅम सेल्वा राज आणि पास्टर ॲलक्स सॅमसन सॅम देत असतात. ते संदेश ९८४१०७१८५८ आणि ९८४१२७१८५८ या वॉटस् अॅप क्रमांकावर देखील ऐकू शकता. तुम्ही हा कार्यक्रम ऐकाल तर आमच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी तुम्हाला प्राप्त होऊ शकते. जगभरात अनेक लोक हा कार्यक्रम पाहून आशीर्वादीत होत आहेत. या द्वारे तुम्ही देखील आशीर्वादीत होऊ शकता. त्यासाठी वरील क्रमांक फोनवर स्टोर करणे महत्वाचे आहे.

३) आमची गावातील **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल** उत्तम प्रकारे सुरु आहे. शाळा निपुण आणि आत्मक प्रौढ शिक्षणतज्ञाद्वारे चालविण्यात येत आहे. आम्हला चांगल्या विद्यार्थ्यांची आणि शिक्षकांची गरज आहे. कृपया प्रार्थनेत या शाळेच्या वाढीसाठी आठवण करा.

४) आमच्या **नहेम्या बायबल कॉलेज** द्वारे हिन्दी भाषेत (निवासी आभ्यासक्रम) आणि तामिळ भाषेत (सायंकालीन अभ्यासक्रम) उपलब्ध आहेत. या कॉलेजमध्ये चेन्नाई मधील



सेन्ट पोल मेट्रीक्युलेशन स्कूल

CHIEF EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

ADMINISTRATION
Bro. N. Prakasam, M.A., General Manager
Dr. Rabinder Boaz, M.S.
Bro. K. Puratchivendan

EDITORIAL BOARD
Sis. Jesy Veena Sam
Sis. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Dr. A. Richard Samuel, M.A., Ph.D.
Rev. Dr. K.R. Rajasekaran

EDITOR, PUBLISHER & PRINTER
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 95661 31858

E.mail ID
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

YOUTUBE CHANNEL
Echo of His Call

उत्तम व्याखाते शिकवित आहेत. आम्हाला देवाच्या सेवाकार्याकरिता दर्शन असलेले विद्यार्थी हवे आहेत. २०२३-२०२४च्या वर्गांची सुरुवात ५ जून २०२३ रोजी होणार आहे. सध्या ३० विद्यार्थी पदवी प्राप्त करण्याकरिता आणि मिशन क्षेत्रात जाण्याकरिता तयार आहेत.



**नहेम्या बायबल कॉलेजची मिटींग**

**नहेम्या बायबल कॉलेज** २४वा दिक्षांत समारंभ ३ जून २०२३ला साजरा करणार आहे.

५) मे महिन्यात मुलांकरिता सुट्टीतील शास्त्राभ्यास शाळा पुष्कळशा ठिकाणी घेण्यात आल्या.

६) आमच्या एकूण १६ भाषांमध्ये प्रसिद्ध होत असलेल्या एको ऑफ हीज कॉल मासिकावर देवाचा हात आहे. तद्वतच आमच्या मंडळ्यावर, टपालद्वारे करण्यात येत असलेल्या शास्त्राभ्यास क्रमावर, शुभ वर्तमान मुद्रणालयावर, लेकरांमधील सेवा कार्यावर, तरुणांमधील सेवेवर, रुग्णालय सेवा इत्यादि वर देखील देवाचा हात आहे. या सर्व सेवाकार्याबद्दल देवाचे आम्ही ऋणी आहोत.

देवानें हे मोठे जग, त्याचे शुभवर्तमान जाहिर करण्यासाठी आपल्या हातात दिलेले आहे. आम्हाला हे दर्शन असलेल्या देवाच्या अनेक सेवकांची आणि या सेवकांची आणि या सेवाकार्याला आर्थिक आधार देणाऱ्या लोकांची गरज आहे.

कृपया आमच्याकरिता प्रार्थना करा. आम्हाला पुष्कळशा आत्मिक युद्धाला सामोरे जावे लागत आहे. देव आम्हाला विजय देत आहे. आम्ही तुम्हा सर्वांकरिता देखील प्रार्थना करीत आहोत.

आपला प्रेमळ प्रभु येशू ख्रिस्त तुम्हा सर्वांना आशीर्वाद देवो. आमेन.

**ख्रिस्त येशूमधील तुमचे दास,**

**पास्टर एस. सॅम सेलवा राज आणि ॲलेक्स सॅमसन सॅम**
(+91) 98412 71858 / 98410 71858,
E.mail : samselvaraj333@gmail.com

(पान १ वरुन...)

बरोबर तसा मी तुझ्या बरोबर असणार.''

देव आपल्यापैकी काहीजणांना जीवनातील एका नवीन काळामध्ये, आपल्या सेवेमध्ये पाचारण करीत आहे. होय, जुने चांगले आहे, तरी देखील आपण आपल्या **जीवनाच्या नवीन काळाचा स्विकार करण्यास-आलींगन देण्यास सुरुवात केली पाहिजे.** मला दिसत आहे, आपल्यापैकी काहीजण म्हणत आहेत, मी आता जीवनाच्या अगदी शेवटास आलो आहे, माझ्या जीवनात आता नवीन काळ कोठे आहे. बर्जिल्लय हा ८० वर्षांचा वृद्ध मनुष्य होता, ज्याने दाविदाला अन्नपाणी पुरविले (२ शमुवेल १९:३२). तेव्हा तुमची इच्छा असेल, देव तुम्हाला नवीन काळाच्या जीवनात नेऊ शकतो.

नवीन काळाला आलींगण्यासाठी स्विकारण्यासाठी आपल्याला जीवनातील काही गोष्टी सोडून द्याव्या लागतील. जुन्याला जर धरुन राहिलो, तर नवीन काळात देवाने साठवून ठेविलेले. आशीर्वाद पूर्णपणे उपभोगता येणार नाहीत.

## १) नवीन काळ!

**यहोशवा १:२ची सुरुवात अशी आहे, ''माझा सेवक मोशे मृत्यु पावला आहे; तर ऊठ, इस्राएल लोकांस जो देश मी**

# अत्यंत तातडीचे निवेदन!

## VERY URGENT ANNOUNCEMENT!

प्रतिकुल परिस्थितीमुळे अनेक ख्रिस्ती मासिके प्रसिद्ध करणे शक्य झाले नाही. अशीच परिस्थिती आपल्या **एको ऑफ हीज कॉल** मासिकाबद्दल देखील उद्भवू शकते. आम्ही आमचे मासिक अत्यंत श्रम घेऊन आणि अत्यंत अडचणींच्या परिस्थितीत पाठवित आहोत. परंतु आम्हला असे समजले की पोस्टातील व्यक्ती ती प्रामाणिकपणे पोहंचवित नाहीत आणि जरी ती पोहंचली तरी काही वाचक ते मासिक उघडून वाचत देखील नाहीत.

तुम्ही जर एको ऑफ हीज कॉल मासिक नियमितपणे प्राप्त करु इच्छिता आणि ते उत्सुकतेने वाचणार असाल, तर कृपया तत्काळ **तुमचा अचुक पत्ता, मोबाईल क्रमांक, तुमचा ईमेल आम्हाला दूरध्वनी, वॉटस् ॲप किंवा ई-मेल द्वारे कळवा.** तुमच्या प्रत मासिक पोहचविण्याचा मार्ग शोधू. तुमच्या सध्याचा पत्ता पाठविला नाही, तर आम्हाला मासिक पाठविणे शक्य होणार नाही. कोणत्याही परिस्थितीत आम्हाला तुमच्याशी असलेले नाते गमवायाचे नाही. कृपया सहकार्य करा.

**आमचा पत्ता :**

**एको ऑफ हीज कॉल**

10, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk. Chennai – 600 005.
Mobile No : +91-98410 71858, +91-98412 71858
Telephone No. (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
E-mail : sam@echoofhiscall.org / echosamselvaraj@gmail.com.
YouTube Channel: Echo of His Call.

**देत आहे त्यांस या सर्व लोकांसह यार्देन उतरुन जा.''**

मी विषयात खोलवर जाण्या अगोदर, या वचनातील कांही शब्द अधोरेखीत करु इच्छिते.

माझा सेवक मोशे मृत्यु पावला आहे. जुने गेले आहे आणि वचनात म्हटले आहे ''तर ऊठ ''**आता**'' नवीन काळाची वेळ आहे. आता देवाने तुजकरीता तुझ्या जीवनातील पुढील नवीन काळासाठी जे ठेविले आहे ते स्विकारण्याची-आलिंगण्याची ही वेळ आहे.

तुझे सेवाकार्य पुढील पातळीवर नेण्याचा आता काळ आहे.

आता देवाच्या तुझ्या कुटुंबावर, तुझ्या लेकरांवर आणि घराण्यावर अनुकुलता-मेहरबानगी दाखविण्याचा काळ आहे.

आताच वेळ... पुढे-नंतर नाही... परंतु प्रश्न असा आहे; आपण इच्छित आहोत कां आणि ते 'आतां'!!! धरण्यास समर्थ आहोत कां.

## २) तयार व्हा!

या वचनातील ज्या पुढील शब्दाने माझे लक्ष वेधिले, तो म्हणजे, देव यहोशवाला ''तर ऊठ'' तयार हो असे सांगत आहे. अनेकदा आपण पहिले पाऊल टाकण्यास कचरतो-तयार नसतो. जो पर्यंत आपल्याला काही प्रत्यक्षात दिसत नाही, तो पर्यंत आपण पुढील हालचाल करु इच्छित नाही. मला ठाऊक नाही, हा लेख वाचत असलेल्यापैकी, देवाने तुम्हाला तुमच्या जीवनातील पुढील काळात घेऊन जाण्याची वाट पाहत आहात, पुढील पाऊल टाकण्यासाठी देवाच्या उत्तराची वाट पाहत आहात.

प्रिय मित्रांनो आजच तो काळ आहे! परंतु प्रश्न असा आहे. तुमची त्याला कवटाळण्यास - स्विकारण्यास तयारी आहे? आपण पुढे जाण्यास पाऊल उचलण्यासाठी स्वत:स विश्वासाने सुसज्ज केले पाहीजे. तुम्हाला काय थांबवून ठेवित आहे याचा विचार करा! तुम्हाला गरज आहे; ती केवळ देवाच्या अभिवचनाची. देवाच्या वचनाशिवाय हालचाल करण्याचा विचार देखील करु नका, परंतु देव जर त्याचे वचन; त्याचे अभिवचन-आश्वासन देत असेल तर मागे-पुढे पाहू नका. हालचाल करा-पुढे व्हा. आपले जीवन थोडके-मर्यादीत आहे; देवाकरीता केले तेच टिकणार आहे. तुम्ही कशाकरिता थांबलेला आहात, आजच पुढे जाण्यास तयार असण्याची वेळ आहे तुम्ही हालचाल करण्याचा आणि पहिले पाऊल टाकण्याचे ठरविता, तुमच्या करीता गोष्टी पुढे सरकतील आपण यहोशवा ३:१३ या वचनात वाचतो, ''अखिल पृथ्वीचा जो प्रभु परमेश्वर याच्या कराराचा कोश वाहणाऱ्या **याजकांचे पाय यार्देनेच्या पाण्यास लागतांच** वरुन वाहत येणारे यार्देनचे पाणी थांबून जमेल व त्याची रास होईल.''

तुम्ही पहिले पाऊल टाकण्याचे ठरविताच, नदी जी तुमच्या पुढे अडखळण आहे ती तुम्हाला मार्ग देईल. तेव्हा तयार अहात कां?

## ३) पलीकडे जाण्यास

देव यहोशवास म्हणाला, आताच वेळ आहे, तयार हो-पलीकडे जाण्यास.

आता पलीकडे जाणे ही प्रक्रीया आहे. ती एका वेळेची गोष्ट किंवा घटना नाही. तुम्हाला विशिष्ट परिस्थितीतून चालावे लागेल, माहित नसलेल्या मार्गातून, काही वेळा तर ती अर्थरहित असेल. इस्राएल लोकांना देव म्हणाला, यार्देन नदी पार करा. ते यार्देन नदी कशी पार करणार? मानवी मनाला त्यामध्ये काही अर्थ वाटत नाही - न समजणारी गोष्ट आहे. माझ्या प्रिय मित्रांनो, देव जेव्हा तुम्हाला अभिवचन देतो, त्याकडे तुम्ही तुमच्या आत्मिक नेत्रांनी पाहण्याची गरज आहे, तुमच्या मानवी नेत्रांनी नाही. आपण मानवी नेत्रांनी पाहण्यास सुरुवात करतो तेव्हा फार दूरवरचे पाहू शकणार नाही... आपल्याला केवळ पाणी आणि किनाऱ्याला धडकणाऱ्या लाटाच दिसतील आणि पाण्याच्या लोंढा घाबरवून टाकील. तुमच्याकरीता नदी पार करण्याचा मार्ग नसणार. परंतु आपल्या आत्मिक नेत्रांनी आपण पाहण्यास सुरुवात करु, तेव्हा देव आपल्या कल्पनेपलीकडे काय करु शकतो ते पाहू शकू. इफिस ३:२० हे बायबलमधील माझे अतिप्रिय वचन आहे. ते असे सांगते, कल्पना करणे ही देवाने मानव जातीला दिलेली सर्वांत मोठी देणगी आहे. व्यक्ति तिला हवे तशी कल्पना करु शकते आणि कोणत्याही समयी. व्यक्तिच्या कल्पना करण्याला मर्यादा नाही आणि मग इफिसकरातील वचनात पाहते, की जेव्हा देवाला त्याच्या लेकरांना आशीर्वाद द्यावयास हवे असते, त्याच्या लेकरांचे जीवन

(...पान ६ वर)


# नहेम्या बाईबल कॉलेज

**निवासी आणि सायंकाळीन कॉलेज**
**वेलाचेरी आणि चेपॉक संतोषपुरम**

**माध्यम : हिंदी/इंग्लीश**

विद्यार्थी ATA सभासद नोंदणीस पात्र
**आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५३ वर्षांपासून मान्यता प्राप्त**

**सर्टिफिकेट इन थियॉलॉजी : कालावधी एक वर्ष**
**डिप्लोमा इन थियॉलॉजी : कालावधी दोन वर्षे**

**शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक**
**प्रवेशा करिता त्वरा करा !**

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org
✻ ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे ✻

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES
SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार
# प्रार्थना विनंत्या

स्तुति आणि प्रार्थनेचे मुद्दे १९ जून ते १८ जुलै२०२३ पर्यंत

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## स्तुति करिता मुद्दे

**१९ जून** : ३ जून २०२३ रोजी **नहेम्या बायबल कॉलेज**चा दिक्षांत विधी अद्भूत रितीने आशीर्वादीत केल्या बद्दल.

**२० जून** : **नहेम्या बायबल कॉलेज**च्या माजी विद्यार्थ्यांचा १० मे २०२३ रोजीचा समारंभ आशीर्वादीत केल्या बद्दल.

**२१ जून** : **नहेम्या बायबल कॉलेज** करिता शैक्षणीक वर्षाकरिता मानद सल्लागार म्हणून रेव्ह. पॉल एबीनेझर यांना देऊन आशीर्वादीत केल्या बद्दल.

**२२ जून** : दर रोज रात्री १० वाजता जगभरातील तरुण/तरुणी आणि लेकरांकरीता प्रार्थना करण्यासाठी **ग्लोबल व्हिजन फॉर यूथ ॲण्ड किड केअर** सेवा सुरु करण्यास मदत कल्या बद्दल.

**२३ जून** : आमची एकूण १६ भाषेतील मासिके दर महिन्याला वेळेवर प्रसिद्ध करण्या करिता समर्पित सह संस्थापक दिल्या बद्दल.

**२४ जून** : निवासी आणि सायंकालीन **नहेम्या बायबल कॉलेज** करिता विद्यार्थी प्राप्त करण्यासाठी केलेले श्रम आशीर्वादत केल्या बद्दल.

**२५ जून** : १९६९ सालापासूनच्या आमच्या मासिक प्रकाशन सेवेवरील आशीर्वादा बद्दल.

**२६ जून** : **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल** साठी नवीन विद्यार्थी मिळविण्या करिता शाळेच्या स्टाफनी घेतलेले श्रम आशीर्वादीत केल्याबद्दल.

**२७ जून** : आमच्या शुभेच्छुकांच्या प्रार्थना आणि पाठबळा बद्दल.

**२८ जून** : आमच्या निवासी आणि सायंकालीन **नहेम्या बायबल कॉलेज** आणि **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल**चे २०२२-२३चे शैक्षणिक वर्ष यशस्वी रित्या पूर्ण केल्या बद्दल.

**२९ जून** : **एको ऑफ हीज कॉल**च्या मुख्य आणि शाखा मंडळ्यांच्या पुढाऱ्यांना आणि विश्वासणाऱ्या सर्वांना आशीर्वादीत केल्या बद्दल.

**३० जून** : मुख्य आणि शाखा मंडळ्यांद्वारे घेण्यात आलेले व्ही.बी.एस्. वर्ग आशीर्वादीत केल्या बद्दल.

**०१ जुलै** : आमच्या सर्व प्रार्थना, वर्गणीदार, विश्वासातील, आजीवन आणि महान आज्ञापालनातील भागीदारां बद्दल.

**०२ जुलै** : यू ट्युब चॅनल वरील तामिळ, तेलगू, इंग्लीश आणि हिन्दी संदेश आशीर्वादीत करीत असल्या बद्दल.

**०३ जुलै** : संस्था आज पर्यंत चालविण्या करिता आम्ही घेत असलेले श्रम फलदायी करीत असल्या बद्दल.

## प्रार्थने करीत ा मुद्दे

**०४ जुलै** : आफ्रीकेमधील सुदान येथील राजकीय प्रक्षोब शांत व्हावा.

**०५ जुलै** : देवाने आमच्या वरिष्ठ पाळकांना त्यांचे आत्मचरित्र लिहिण्यास मनाचा मोठेपणा आणि मार्गदर्शन पुरवावे.

**०६ जुलै** : आमचे वरिष्ठ पाळक पास्टर एस्. सॅम सेलवा राज यांना आणि त्यांच्या कुटुंबाला दुष्ट शक्तिंपासून सुरक्षित राखावे.

**०७ जुलै** : जगभरातील सर्व पंथांच्या मंडळ्यांत संजीवन घडून यावे.

**०८ जुलै** : **एको ऑफ हीज कॉल** सेवा कार्या करिता देवाने आणखीन समर्पित सेवक आणावेत.

**०९ जुलै** : कोविड आणि इतर संसर्गजन्य रोगांचे समूळ उच्चाटन व्हावे.

**१० जुलै** : **ग्लोबल व्हिजन फॉर युथ ॲण्ड किड केअर** या सेवेत प्रार्थना करण्यासाठी अधीकाधीक लोकांनी नावे नोंदवावीत.

**११ जुलै** : पालकांना कुटुंबातील तरुण आणि लहान लेकरांची वाढ करण्या करिता दैवी मार्गदर्शन मिळावे.

**१२ जुलै** : दुर्गम भागात सुवार्ता प्रसार करीत असलेल्या मिशनऱ्यांचे रक्षण व्हावे.

**१३ जुलै** : २०२३-२४ या शैक्षणीक वर्षांकरीता **नहेम्या बायबल कॉलेज**साठी निवासी आणि सायंकालीन सत्रां करिता पात्र विद्यार्थी मिळावेत.

**१४ जुलै** : २०२३-२४ या शैक्षणीक वर्षांकरिता **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल** मध्ये प्रवेशासाठी नवीन विद्यार्थी मिळावेत.

**१५ जुलै** : जगभरात घेण्यात आलेल्या व्ही.बी.एस्च्या वर्गात तारण पावलेल्या तरुणांसाठी आणि लेकरांसाठी.

**१६ जुलै** : मादक पदार्थ सेवन करण्याची सवय लागलेल्या आणि शाळा, कॉलेजला अनियमित हजर राहणाऱ्या मुलांच्या-तरुणांच्या सुटके करिता.

**१७ जुलै** : या महिन्यातील सर्व आर्थिक गरजा भागविल्या जाव्यात.

**१८ जुलै** : जगभरातील ठराविक कालावधीच्या आजाराने आणि नैराश्येने ग्रासलेल्या लोकांच्या मुक्तते करिता.

(पान ४ वरुन)

त्याच्या इच्छेने भरून टाकावसे वाटते, तेव्हा माझा देव त्या कल्पनेला देखील अमर्यादीत आवाहाने देतो ते अमर्यादीत वेळेचे आणि अंत नसलेले असते.

"**आपण ज्याची कांही मागणी किंवा कल्पना करितो त्यापेक्षा आपल्यामध्ये कार्य करणाऱ्या शक्तीने फारच फार करावयास जो शक्तिमान आहे**". (इफिस ३:२०)

तो म्हणत आहे, त्याहीपेक्षा अधीक करील. आमेन! हे या प्रभु ख्रिस्ताचे सामर्थ्य आहे. तुम्ही जर अजून त्याचा अनुभव घेतला नसेल, तर तो तुम्हांसाठी काय करू शकतो ते पाहा. तुम्हाला जर विश्वास असेल तर त्याला मागा, तो तुमच्या मागण्याच्या आणि कल्पनेच्या पलीकडे करु शकतो.

देव जर तुम्हाला काहीतरी करावयास सांगत आहे, ते जरी अर्थरहित असले, तरी देखील ते करा. कारण तो आपल्या मागण्या आणि कल्पनेच्यापलीकडे करु शकणारा देव आहे. मग काळजी कशाला करावी? ईयोबाच्या पुस्तकात अतीशय सुंदर रित्या म्हटले आहे, "**तो अतकर्य अद्भूत कृत्यें करितो, तो अगणित अद्भूत कृत्ये करितो.**" (ईयोब ५:९)

आपल्याला एवढेच करावयाचे आहे, ते म्हणजे देव देऊ करीत असलेल्या भूमिकडे जाण्यास तयार व्हावयाचे आहे. ती वेळ आताच आहे! ज्या जागी तो घेऊन जाणार आहे त्या अभिवचन दिलेल्या जागेकडे. प्रसंग, परिस्थिती, आर्थिक स्थिती, कौटुंबिक पार्श्वभूमी, शैक्षणीक पातळी, अनुभव, शरिर स्वास्थ्य, वय, तुमचे लींग (स्त्रीं किंवा पुरुष) याकडे पाहू नका - आपला देव या सर्वांपलीकडे कार्य करु शकणारा देव आहे. एकच गोष्ट आहे -तुम्ही आता तयार आहात कां?

मी कोठे उभी आहे, आणि देव मला कोठे नेऊ इच्छितो हे मला माहित आहे, परंतु अ ठिकाणावरुन ब ठिकाणी जाण्यापासून असे काय आहे जे मला थांबवून ठेवित आहे, ज्या विषयी मला चांगलेच कळते की मला कोठे जावयाचे आहे? यासाठी, मला तुमचे लक्ष मत्तय १३ अध्यायाकडे वेधावयाचे आहे. ती शब्बाथ शाळेतील परिचीत गोष्ट आहे. पेरणी करणाऱ्याची गोष्ट. एक मनुष्य बी पेरण्यास निघतो आणि आपल्याला ठाऊक आहे कि ते बी चार वेगवेगळ्या प्रकारच्या जमिनीवर पडते. मी तुम्हाला जर प्रश्न केला; की, तुम्ही कोणत्या प्रकारची जमीन आहा? तर बहुतेक सर्वजण म्हणतील 'चांगली जमीन'. आपल्या सर्वांना चांगली जमीन व्हावे असे वाटते. ती आपली अपेक्षा असू शकते, परंतु वास्तविकता वेगळी असू शकते. आपले जीवन आणि जे फळ आपण देतो तेच आपले खरे उत्तर असणार. अपेक्षा विरुद्ध वास्तविकता यात नेहमीच अंतर असते. माझा बारा वर्षांचा मुलगा एक चांगला फुटबॉल खेळाडू आहे आणि त्याबद्दल देवाचे आभार मानिते. तो सहा वर्षांचा असताना, जेव्हा त्याने फुटबॉल खेळण्यास सुरुवात केली. मी एकदा त्याच्या प्रशिक्षणाच्या वेळेत त्याच्याकडे गेले. माझ्या मुलाने बॉलला जोराने लाथ मारिली आणि वर हवेत बॉलकडे पाहू लागला. बॉल कोठेही दिसत नव्हता आणि मी मैदानाकडे पाहिले, तर बॉल केवळ काही सेंटिमीटर अंतरावरच होता. काय प्रतिक्रिया व्यक्त करावी मला कळेना. माझा मुलगा स्मित हास्य करीत, माझी आई माझा केळ पाहत असल्याच्या अभिमानाने माझ्या जवळ आला आणि मला विचारले, मी कशी लाथ मारिली ती तूं पाहिलीस कां? मला कळेना कि, मी कठोर होऊन त्याला उत्तर द्यावे... माझ्या मुला तू बॉलला लाथ मारलीच नाहीस किंवा एक आई या नात्याने त्याला उत्तेजन पर आणि होकारार्थी उत्तर द्यावे? सरते शेवटीजी प्रत्येक आई करते तेच मी केले! मी म्हणाले, वा; ती अतिशय जोराची लाथ होती." मी त्याच्या चेहऱ्यावर एक प्रकारचे अमोल हास्य पाहवयास मिळाले. त्याची अपेक्षा ही वास्तविकते पेक्षा वेगळी होती.

अशाच प्रकारे आपल्या सर्वांना चांगली जमीन व्हावे असे वाटते. प्रभुची स्तुती असो! परंतु, प्रत्यक्षात काय आहे? त्याचे उत्तर तुम्ही स्वत:च देवू शकता.

मत्तय १३:४ "**आणि तो पेरीत असतां कांही बी वाटेवर पडले, व पाखरांनी येऊन ते खाऊन टाकले.**" बी वाटेवर पडले तेव्हा ते पाखरांनी येऊन खाऊन टाकले.

आणि १९ वचनामध्ये येशू त्याच्या शिष्यांना तो दाखला समजावून सांगतो.

मत्तय १३:१९ "**कोणी राज्याचें वचन ऐकतो पण समजत नाही; तेव्हां तो दुष्ट येऊन त्याच्या अंत:करणात पेरलेले ते हिरावून घेतो, वाटेवर पेरलेला तो हा आहे**".

मी या वचनातील दोन गोष्टींवर तुमचे लक्ष केंद्रीत करु इच्छिते. आपण जेथे जावे अशी देवाची इच्छा आहे, ती समजण्यास तो आमची मदत करो.

पहिल्या मातीविषयी स्पष्टीकरण देत असताना तो म्हणतो, "दुष्ट येऊन हिरावून घेतो." आमच्या अंत:करणात, आमच्या जीवनात काहीतरी करण्या अगोदर, तो दुष्ट, सैतान येऊन ते हिरावून घेतो. प्रत्यक्षात ते कसे घडते?

मला एक गोष्ट सांगू द्या. ती एक काल्पनिक कथा आहे. एके दिवशी सैतानाने त्याच्या सर्व खाली टाकण्यात आलेल्या त्याच्या दुता करिता, त्यांनी घेऊन लोकांना देवाच्या इच्छे पासून वळविण्या करीता साधन विकत घेण्याकरीता त्याचे गोदाम खुले ठेविले. प्रत्येक साधना खाली-शस्त्राखाली त्याची किंमत लिहीलेली होती. तेथे खून, मस्तर-हेवा, लुबाडणूक, दिरंगाई-चालढकल, लबाडी इत्यादी होते; तेथे अतिशय छोट्या असून देखील अतिशय महाग असणाऱ्या दोन गोष्टी होत्या. तुम्हाला काय वाटते; सैतान आपल्या जीवनात कार्य करण्याकरिता कोणत्या शक्तिशाली साधनाचा - हत्याराचा वापर करतो - नाऊमेद - उत्साहभंग आणि मनाचा गोंधळ?

**मनाचा गोंधळ** हे सैतानाचे सर्वात शक्तिशाली साधन - हत्यार आहे, जे आपल्याला देवाची आपल्या जीवनाविषयी असलेली योजना पूर्णतेस न नेण्यापासून वळवून आपला नाश करु शकते. आपण हे लक्षात ठेविले पाहीजे, कि जर आपण देवाची इच्छा पूर्ण करण्याकरिता स्वत:ची तयारी करीत नाही; तर चुकून सैतानाची योजना पूर्ण करण्याची तयारी करीतो. दुसऱ्या शब्दात, तुम्ही जर देवाच्या इच्छेमध्ये नसाल, तर तुम्ही सैतानाच्या इच्छेमध्ये आहा. हे मान्य करण्यास कठीण आहे, हे मला कळते!

तुम्ही कदाचीत देवाचे सेवाकार्य करीत असाल परंतु प्रश्न असा आहे, ती सेवा देवाच्या इच्छेनुसार करीत आहात कां? तुम्ही ती देवा करीता करीत आहा किंवा त्याच्या सह करीत आहा? आपण प्रत्येकाने स्वत:स हा प्रश्न विचारला पाहीजे. अनेकदा माझ्यासकट आपण सर्व असे समजतो - जी काही सेवा आपण करीत आहोत ती

देवाच्या इच्छा समजुन न घेता नवीन असे काही करण्याचे साहस करु नका. देवाकडे त्यासाठी अभिवचन मागा आणि त्यानंतरच ते सुरु करा.

देवाच्या इच्छेपासून जर कोणती गोष्ट आम्हाला दूर नेत असेल तर ती - '**मनाचा गोंधळ**'!

मी मनाचा गोंधळ म्हणते, तो अगदी सहजपणे ओळखता येत नाही सैतान नेहमीच हुशर, न दिसणारा आणि कावेबाज फसवा असा असतो. तो मनाचा गोंधळ अशा प्रकारे करितो कि त्याचा प्रतिकार करणे तुम्हास कठीण जाते.

उत्पत्ति ३:६ हे वचन पाहू या. बायबल सांगते की हवेने जेव्हा ते फळ पाहीले; ते **दिसण्यात मनोहर** होते.

...झाड **सुंदर** होते आणि फळ **खाण्यास मनोहर** आणी **शहाणपणाच्या प्राप्तीस इष्ट** आहे.

ते दिसण्यात **मनोहर** होते.

ते सुखकारक - आनंददायक, सुंदर होते, रुचकर, दिसण्यात मनोहर आणि सर्वा पेक्षा अधिक म्हणजे ती शहाणी होऊ इच्छित होती. या पैकी कांही वाईट आहे कां? या पैकी कोणतेही एक सैतानापासून असल्या सारखे वाटते कां? हे सर्वांना हवेसे वाटत नाही कां? ते **मनाचा गोंधळ उडविणारे** दिसतात कां?

सुंदर दिसण्यात, मधुर, मनोहर आणी शहाणे होऊ इच्छिण्यात काय चुकते? ते मनाचा गोंधळ करणारे कसे होऊ शकतात?

परंतु आपण पाहतो ते मनाचा गोंधळ करणारे होते - ते संपूर्ण मानव जातीला नाशाकडे नेणारे झाले. लक्षात ठेवा, मनाचा गोंधळ उडविणारे सर्व नेहमीच अतिशय आकर्षक स्वरुपात आणि आकारात, रंगदार आणि डोळ्यांना सुंदर असे होते. ते खरोखरीच चांगले असणार. कसे असो, जर ते तुम्हाला देवावर दृष्टी केंद्रीत करण्यापासून दूर नेत असेल तर त्यावर लक्ष दिले पाहीजे.

तुम्हाला ठाऊक आहे, जर तुम्ही म्हणाल हा माझा सर्वांत मोठा गुण आहे, तर सावध असा, सैतान त्यावरच जोराने प्रहार करील. पेत्र म्हणाला होता, मी तुजबरोबर मरावयास देखील तयार आहे. पेत्राला वाटले होते - त्या विषयी तो भक्कम आहे. त्याला वाटले होते, ख्रिस्तावरील त्याच्या असलेल्या प्रेमापासून त्याला काही दूर करु शकणार नाही. परंतु येशूने तत्काळ त्याला म्हटले ''कोंबडा आरवण्या अगोदर तूं तीन वेळा मला नाकारशील''.

प्रिय मित्रांनो, तुम्ही कशा बाबतीत भक्कम आहात त्यावर विचार करा. तुमच्या जीवनाविषयी जीवनातील प्रत्येक भागासाठी, तुमच्या लेकरांकरीता, कुटुंबाकरीता व्यवसायाकरीता, सेवाकार्या करीता, तुमच्या पाचारणा करीता आणि अभिषेका बद्दल प्रार्थना करा. आम्हाला मार्गातील पावलागणीक त्याच्या शक्तिची गरज आहे, नाही तर, आपण गोंधळून जाऊ आणि देवाने आपल्या जीवना करिता जे ठेविले आहे ते गमावू.

सैतान गर्जणाऱ्या सिंहासारखा आपल्याला गिळावे यासाठी सतत मागे असतो (१ पेत्र ५:८) त्यामुळेच सावध असा, जागे रहा.

बायबलच्या विस्तारीत भाषांतर प्रतीत असे म्हटले आहे... समतोल राखा आणि शिस्तबद्ध असा. सावध असा. सर्व समयी सावध असा. कारण सैतान गर्जणाऱ्या सिंहाप्रमाणे कोणाला मिळावे हे शोधीत फिरत आहे.

मी तुमच्या खांद्यावर हळूवारपणे हात ठेवून सांगते, जागे व्हा! ही तुम्ही जागे होण्याकरिताची हांक आहे! **दक्ष रहा, जागरूक रहा! सावध असा.** सर्व कांही थांबवून पुढील काही दिवस किंवा आठवडे केवळ देवाकडे दृष्टी लावा. वैयक्तिकरित्या देवाला तुमच्याशी बोलावयास लावा आणि तुम्ही काय करावे अशी त्याची इच्छा आहे ते प्रकट करण्यास सांगा. या विषयी स्पष्ट कल्पना येई पर्यंत उपास, प्रार्थना करीत राहा. कारण, सैतान तुम्हाला गोंधळात पाडू इच्छितो किंवा त्याने या आधीच तुमच्या जीवनात गोंधळ पेरला असेल. माझ्या प्रिय बंधुंनो आणि बहिणींनो, आता आपण दृष्टी केंद्रीत करण्याची गरज आहे.

माझी मन:पूर्वक प्रार्थना आहे की आपण सर्व, विशेषत: या शेवटच्या दिवसात, देवाच्या आपल्या जीवनाविषयीच्या असलेल्या हेतु आणि योजनेपासून नकळत निसटून जाऊ नये. लक्षात ठेवा, जर आपण देवाची इच्छा पूर्ण करीत नाही, तर सैतानाची इच्छा पूर्ण करतो.

मी तुम्हाला दाखवू इच्छिते, कि आपल्या जीवनात आणि विशेषत: देवावर प्रेम करीत असल्याचा दावा करणाऱ्यांच्या जीवनात हा '**मनाचा गोंधळ**' किती सामर्थ्यशाली होऊ शकतो. बायबल सांगते देवाची इस्त्राएलला आशीर्वाद देण्याची इच्छा आहे. कोणी त्याला शाप देऊ शकत नाही. कोणतीही अंधकारमय शक्ती, चेटके किंवा दुष्टता देवाच्या लेकरांच्या विरोधात कार्य करु शकत नाही, त्यामध्ये तुम्ही आणि मी देखील आहोत. परंतु एक अशी वस्तू आहे जी आपल्या जीवनात गोंधळ, घडवू शकते आणि त्या एकाच व्यक्तिला तो घडविण्याचा

....*Contd. to page 9*


## एको ऑफ हिज कोल
### एक चांगली संधी
### मासिक मोफत मिळवण्यासाठी

जर तुमच्या मित्र/नातेवाईकांना पत्ता पोस्टाने, पत्राने, इमेलने, वॉटस्‌अपने किंवा फोन द्वारा आम्हाला पाठविला, तर एको ओफ हिज कॉल मासिक त्यांनी मोफत पाठवुं.



## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर ''**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**'' च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| Account Name | : | ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST |
| Account Number | : | 1023 2923 805 |
| Bank Name | : | STATE BANK OF INDIA |
| Branch | : | TRIPLICANE, CHENNAI - 600 005 |
| IFSC Code | : | SBIN 0000249 |
| SWIFT Code | : | SBI NIN BB 455 |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**“नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !” (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

# प्रभु जो आमच्या इच्छा पुरवितो

## THE LORD WHO GRANTS OUR DESIRES!

“कारण इच्छा करणे व कृति करणे ही तुमच्या ठायी आपल्या सत्संकल्पासाठी साधून देणारा तो देव आहे.” (फिलीप्पै २:१३)



मी १८ वर्षाचा होतो, त्यावेळेस मी माझ्या वडिलांना, त्यांच्या भावांना त्यांच्या कुटुंबियांसह नियमितपणे मंडळीत उपासना करताना आणि गाणी गात असताना पाहत असे आणि मी त्यांना कोणत्या ना कोणत्या तरी मार्गाने मदत करीत असे. मी बाजाची पेटि देखील वाजविण्यास शिकलो.

मी स्थापन केलेल्या आणि पुढारपण करीत असलेल्या '**गुड न्युज प्रेअर बॅण्ड**' या संघा द्वारे गायक आणि वाद्यवृंद तयार केला. देवाने मला अनेक खेड्यांत येशू ख्रिस्ताची सुवार्ता गाजविण्यास सहाय्य केले. संघ या नात्याने आम्ही देवाचे वचन संदेश रुपाने देऊ शकत होतो, साक्ष देत होतो आणि गाणी गात होतो. या गटात ज्या व्यक्ति होत्या त्या म्हणजे बंधु वेलस्ली देवदासन (सध्या हेरॉल्ड ऑफ हिज कमींग), रेव्ह. ए. सेलवाराज (सध्या सी.एस.आय. चे मिशनरी पास्टर), रेव्ह. जॉन रोझ कमालम (सध्या सी.एस्.आय्. मदुराई येथे वरिष्ठ पाळक), वायोलीन वादक बंधु डेविड रेजीनॉल्ड (शिक्षक), रेव्ह. पौलस (सी.एस्.आय्. पास्टर), मिस्टर जयचंद्रन (ए.ओ.जी. पास्टर) आणि मिस्टर जयानंदा पॉलमणी (शिक्षक) हे होते.

मी माझी अवजड बाजाची पेटी खांद्यावर घेऊन खेड्यापाड्यात, बाजार स्थळी आणि रस्त्याच्याकडेला जात असे. अशा ठीकाणी मी गाणी गात असे, साक्ष देत असे आणि देवाचे वचन देखील सांगत असे. मी हजारो सुवार्ता पत्रिकांचे वितरण केले आहे. या सर्व गोष्टी मी अत्यंत आनंदाने आणि मन:पूर्वक करीत असे. मी एकट्याने देखील, खांद्यावर माझी अवजड बाजाची पेटी घेऊन अनेक मैल चालत जाऊन सर्व प्रकारच्या धर्माच्या लोकांना प्रभु येशू ख्रिस्ताची सुवार्ता गाजवीत होतो.

मी तरुण असताना ज्या ठिकाणी जाऊन बाजाच्या पेटीवर ख्रिस्ती गाणी गाईली होती, त्या ठिकाणांना भेट देतो, तेव्हा मी आचंबीत होतो. मी ज्या सर्व ठिकाणी संदेश दिले, सुवार्ता पत्रिका वाटल्या, त्या सर्व ठिकाणी मला अनेक प्रार्थना मंदिरे उभी राहिलेली आणि अनेक ख्रिस्तीजन या सर्व ठिकाणी पहावयास मिळत आहेत. मला आठवते त्या दिवसात मला शिक्षण नव्हते आणि समाजात स्थान नसल्यामुळे लोक माझा उपहास करीत असत.

दिवस सरुन गेले. देवाने मला पायरी पायरीने वर चढविले त्याने मला दैवी शहाणपण, लोकांचा पाठींबा आणि आर्थिक स्थान देऊन आशीर्वादीत केले. त्या दिवसात अतीशय महाग अशा किमतीचे ॲकॉर्डीयन हे वाद्य देखील दिले. हे वाद्य विकत घेण्यास मजकडे पैसे नसल्यामुळे माझ्या वंदावासी येथील एम्. पदमानंदन या मित्राने त्याच्या पत्नीची लग्नाची सोनसाखळी तारण ठेऊन ते वाद्य खरेदी करण्यास पैसे दिले. माझा स्वत:चा वयाने लहान भाऊ एस्. बीजीली सॅमराज याने देखील मदत केली.

अशा प्रकारे माझ्या प्रभु परमेश्वराने मला टि.व्ही. वर आणि आता यूट्युब चॅनलवर बोलणे शक्य होऊ दिले. माझे संदेश तामिळ, इंग्रजी, हिन्दी आणि तेलगु भाषेत प्रसारीत होत आहेत. मला आधार देण्यास देवाने गायक आणि वाद्य वाजविण्यास वादक पुरविले आहेत. मला उचलून धरण्यास देवाने मुख्यालयाची मंडळी दिली आहे. देवाने मला सेवा कार्याकरीत अनेक शाखा मंडळ्या आणि सहाय्यक सहकारी दिले आहेत.

प्रिय वाचकांनो, माझी खात्री आहे, तुम्ही देखील देवासाठी काहीतरी करु इच्छित आहात. ते तात्काळ सुरु करा. तुम्हाला कदाचीत लोकांचे पाठबळ किंवा आर्थिक पाठबळ नसेल जर मन असेल तर मार्ग मिळेल? उशीर करु नका! आजच सुरुवात करा! आताच करा!!

“कारण इच्छा करणे व कृति करणे ही तुमच्या ठायी आपल्या सहसंकल्पासाठी साधून देण्यारा तो देव आहे. (फिलिप्पै २:२३)

************

(पान ७ वरुन...)

अधिकार आहे ती म्हणजे आपण स्वत:

हे देवाच्या वचनातून पाहू या मवाबचा राजा जेव्हा इस्त्राएल लोकांना शाप देवू इच्छित होता, त्याने बलामाला त्यांना शाप देण्याकरिता आमंत्रीत केले. बलाम देवाच्या लोकांना शाप देण्यास धडपडू लागला आणि प्रत्येक वेळी आशीर्वाद देत गेला. तेव्हा मवाबचा राजा बालाक निराश होतो आणि तो फार क्रोधीत होतो. सरते शेवटी बलाम त्याला सल्ला देतो, तो म्हणतो हे देवाचे लोक आहेत आणि त्यांना आशीर्वाद देण्याची त्याची इच्छा आहे. तेव्हा असा कोणताही मार्ग नाही ज्या द्वारे तूं त्यांना शाप देऊ शकतो किंवा त्यांचा नाश करु शकतो. परंतु तूं त्यांचा नाश करण्याचा एक मार्ग आहे आणि तो म्हणजे गोंधळ करुन ज्यामुळे देव क्रोधीत होईल आणि त्यांचा नाश करील.

"**पाहा, बलामाच्या मसलतीवरुन पैराच्या प्रकरणी इस्त्राएल लोकांकडून परमेश्वराशी फितुरी करविणयस त्या स्त्रिया कारण झाल्या आणि त्यामुळे परमेश्वराच्या मंडळीत मरी पसरली.**" (गणना ३१:१६)

बलामाचा सल्ला होता, मोआबच्या स्त्रियांना इस्त्राएलमध्ये पाठविण्याचा. त्या स्त्रियांनी इस्त्राएल पुरुषांना लैंगीक संबंध ठेवू देण्यास परवानगी दिली, फक्त अट होती की त्यांना त्यांच्या सोबत त्यांच्या देवाची उपासना करावी. तो देव Baal Peor किंवा "the Lord of Opening", त्या स्त्रिया इस्त्राएल पुरुषांसमोर उघड्या होण्यास तयार झाल्या; जर ते त्यांच्या देवाची उपासना करण्यास तयार होतील.

बलामाला इस्त्राएलांचे मनोदौर्बल्य ठाऊक होते यात शंका नाही, एवढेच नाही तर त्याला देवाला त्याच्या व्यतिरिक्त कोणा दुसऱ्या देवाची उपासना केल्यावर काय वाटते हे देखील ठाऊक होते. तो हेवा वाटणारा, नष्ट करणारा अग्नी आहे. कोणीही दुसऱ्या देवाची उपासना करणे किंवा त्याचे स्थान दुसऱ्या कोणालातरी देणे, तो अजीबात खपवून घेणार नाही. अशा प्रकारे बलामाचा सल्ला त्यांना गोंधळात टाकण्याचा, ज्या द्वारे ते देवाच्या इच्छेपासून दूर जातील आणि देवाचा क्रोध त्याच्या जीवनावर ओढवून घेतील.

*प्रिय मित्रांनो, मला ठाऊक नाही तुम्ही कोणत्या परिस्थितीतून जात आहात किंवा जीवन प्रवासात कोठे आहात, तुमच्या जीवनातील गोंधळाबद्दल काळजी घ्या. तुमच्या डोळ्यांना ते नेहमीच आनंददायक, सुंदर वाटेल. तुमच्या हृदयाला आनंद देईल. परंतु ते देवाने तुमच्या जीवनाकरिता जे योजीले आहे त्यावरून लक्ष विकेंद्रित करील. बाजूला व्हा! देवाने तुम्हाला शक्ति द्यावी अशी विनंती करा.*

*विशेषत: तरुण/तरुणींनो विवाहाच्या बाबतीत काळजी घ्या. विवाह म्हणजे आत्मा जिंकणे नाही. जडून विजोड होऊन नका. तुमचा विश्वास आणि दर्शन तुमच्या (जोडीदार/जोडीदारणीशी) जुळणे गरजेचे आहे. नाहीतर आयुष्यभर ओढाताण होणार.*

*मी प्रार्थना करीते की हा लेख वाचणाऱ्या आपणा सर्वांस आपला मनाचा गोंधळ ओळखण्यास देवाने मदत करावी आणि त्यापासून दूर होवून जीवनाच्या नवीन काळास - हंगामास आलींगन देता यावे.*

## कृपया आमच्यासाठी प्रार्थना करा

सिंहाला भाषेतील **एको ऑफ हीज कॉल** मासिक श्रीलंकेला पाठविण्याचा प्रति मासिक ३१ रुपये एवढा खर्च होतो. आम्ही प्रार्थना करीत आहोत - कि मासिकाच्या प्रति श्रीलंकेला नेण्यास आणि स्थानिक रित्या त्याचे वितरण करता यावे यासाठी देवाने मार्ग उघडावा. कृपया याकरीता प्रार्थना करा.

- संपादक

## टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्याह बाईबल कॉलेज**

Echo of His Call, Post Box 2957
CHEPAUK, CHENNAI - 600 005.
Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell : 98410 71852, 95661 31858
E.mail : biblecor@yahoo.co.in

## प्रिय वाचक!

वाचा आणि खूण करुन आम्हाला पाठवा. **एको ऑफ हीज कॉल** द्वारे तुम्हाला भेट देण्यात येईल!

१) तुम्ही आज **एको ऑफ हीज कॉल** सेवे करिता प्रार्थना केली? होय ☐ नाही ☐

२) तुम्हाला **एको ऑफ हीज कॉल** मासिक नियमितपणे प्राप्त व्हावे असे वाटते. होय ☐ नाही ☐

३) **एको ऑफ हीज कॉल** मासिकाकरिता वाचक मिळविण्यास आवडेल कां? (पैसे मिळविण्याची आवश्यकता नाही) होय ☐ नाही ☐

४) तुम्हाला कोणता विषय आवडतो? मुख्य (संदेश) लेख ☐, किंवा प्रकाशकीय ☐ किंवा खड्यातुन महाला पर्यंतची मालीका ☐

५) आमचा वॉटस् अॅप क्रमांक राखून ठेविला आहे; होय ☐ नाही ☐

६) **एको ऑफ हीज कॉल यूट्युब चॅनलचे** वर्गणीदार अहात कां. होय ☐ नाही ☐

७) आमच्या युट्युब चॅनल वरील संक्षिप्तात असलेले संदेश ऐकता. होय ☐ नाही ☐

८) आमच्या यूट्युब चॅनलवरील इंगजी, हिन्दी, तामिळ आणि तेलगू भाषेत प्रसारीत होत असलेले ५ मिनिटांचे मननपर संदेश ऐकता कां. होय ☐ नाही ☐

कृपया हा भाग कापा व खूण करुन आमच्याकडे पाठवा. आमच्याकडून तुम्हाला भेट पाठविली जाईल.

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/21-23 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/21-23

*माघार घेणे थांबवा आणि पुढे जात रहा। देव तुम्ही मागू शकता किंवा कल्पना करु शकता त्याहीपेक्षा अधीक करु शकतो. तुमच्या नवीन काळास - हंगामास कवटाळा - आलींगन द्या! देव तुम्हाला आशीर्वाद देवो!!*

*******

## OUR BANK DETAILS:

***1. Bank : State Bank of India***

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

***2. Bank : ICICI Bank***

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

***3. Bank : State Bank of India***

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**
*****
**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-    आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/21-23**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/21-23**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th JUNE 2023**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers**, New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**